## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

# प्र क ट न

विषयः सन २०२१ मध्ये आयोजित करण्यात आलेली उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा रद्द केलेबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा एप्रिल–मे २०२१ चे आयोजन दि.२३/०४/२०२१ ते दि.२९/०५/२०२१ या कालावधीत करण्यात आलेले होते. तद्नंतर शासन आदेशानुसार सदर परीक्षा पुढे ढकलण्यात आली व ती माहे जून २०२१ मध्ये घेण्याचे प्रस्तावित होते. तथापि कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे, इ.१२ वी च्या परीक्षेत मोठया प्रमाणातील परीक्षार्थी उपस्थित राहणार असल्याने कोरोना विषाणूचा संसर्ग वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. परीक्षार्थीच्या कुटुंबातील एखादा सदस्य कोरोना बाधित असल्यास त्या परीक्षार्थीने परीक्षेस उपस्थित राहिल्यास त्याच्या संपर्कात येणाऱ्या परीक्षार्थीनाही संसर्ग होण्याचा धोका निर्माण होवू शकतो. त्यामुळे हे कोरोना विषाणू प्रादुर्भाव वाढविण्यास कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे याप्रकारच्या परीक्षा ज्यामध्ये परीक्षार्थींना प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागेल. अशा प्रकारच्या परीक्षा टाळणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने इ. १२ वीच्या परीक्षा रद्द करण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे.

या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ सर्व विद्यार्थ्यांचे व परीक्षेशी संबंधित सर्व घटकांचे हित लक्षात घेता, सन २०२०- २०२१ या शैक्षणिक वर्षासाठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षिततेचा विचार करता शासन निर्णय क्र.परीक्षा ०६२१/प्र.क्र.४६/एसडी–२, मंत्रालय, मुंबई–३२ दि.११/०६/२०२१ अन्वये रद्द करण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे.

तरी याबाबतची सर्व मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा, शिक्षक, विद्यार्थी, पालक व इतर सर्व संबंधित घटकांनी नोंद घ्यावी.

दि.१४/०६/२०२१

सचिव
राज्यमंडळ, पुणे – ०४

---

क्र.कोविमं/१२वी परीक्षा/ ४02
कोल्हापूर ४१६००४
दि. १५/०६/२०२१
१७

प्रति,
प्राचार्य,
सर्वमान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली कोल्हापूर

सन २०२१ मध्ये आयोजित उच्च माध्यमिक (इ.१२वी) प्रमाणपत्र परीक्षा रद्द केलेबाबत शासन निर्णय दि.११/०६/२०२१ अन्वये शासनाने निर्णय घेतलेला आहे. वरील प्रकटनाची नोंद घेवून तसे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

(देविदास कुलाळ)
**विभागीय सचिव**
**म.रा.माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर–४१६००४.**